## आयुक्त, कर्मचारी नुकसानभरपाई कायदा तथा न्यायाधीश, कामगार न्यायालय, सांगली यांचे न्यायालयात

## अर्ज (ई. सी.) क्र. ४८/ए–१७/२०२४

CNR No. MHLC100004632024

**कस्तुरी फौंड्री प्रा. लि.**
आष्टा, ता. वाळवा, जि. सांगली .. **अर्जदार**

**विरुध्द**

**निहाल नजीम सय्यद,**
रा. मिसाळवाडी, विलासराव शिंदे नगर,
आष्टा, जि. सांगली .. **जाबदार**

## निशाणी यु–५ वर आदेश

(दि. ०९/०९/२०२५)

१. प्रस्तुतचा अर्ज हा जाबदार यांनी गो डिजीट जनरल इन्शुरन्स कंपनी यांना प्रकरणामध्ये आवश्यक पक्षकार म्हणून सामिल करून घेणेकरीता दाखल केला आहे.

**जाबदार यांचे थोडक्यात कथन खालीलप्रमाणे** :

२. जाबदार हे अर्जदार यांचे कंत्राटदारातर्फे कामास होते. दि. १८/०९/२०२४ रोजी अर्जदार कंपनीचे काम करीत असताना जाबदार यांचा अपघात होवून ते जखमी झाले. अर्जदार कंपनीने सर्व कामगारांसाठी विमा पॉलिसी काढली असून सदर पॉलिसी गो डीजीट जनरल इन्शुरन्स लि, बिझनेस सेन्ट्रल ऑफीस नं. ४०२, सी. एस. नं. १२२४ सी, प्लॉट नं. ५१–ए, राजारामपुरी, कोल्हापूर या विमा कंपनीची असून तिचा नंबर D130049093 असा आहे. सबब, सदर विमा कंपनी प्रस्तुत कामी पक्षकार म्हणून सामिल होणे गरजेचे आहे. त्याचप्रमाणे, या न्यायालयाने दि. १८/०३/२०२५ रोजीच्या आदेशाने जाबदार यांना कागदपत्र दाखल

करणेकरीता आदेश केले. सदर आदेशानुसार जाबदार यांनी दि. ११/०४/२०२५ रोजी कागदपत्राची पुर्तता करून ५० टक्के अपंगत्वासंदर्भातील प्रमाणपत्र दाखल केले आहे.

३. अर्जदार कंपनीने ४० टक्के अपंगत्वाप्रमाणे या न्यायालयात रक्कम रू. ७,८६,४९२/– इतकी नुकसानभरपाईची रक्कम जमा केली आहे. जाबदार यांचे अपंगत्वाचे प्रमाण हे ५० टक्के असल्याने नुकसानभरपाईची रक्कम ९,८३,११५/– इतकी येते. सबब, प्रस्तुतकामी गो डीजीट जनरल इन्शुरन्स कंपनी लि. यांना आवश्यक पक्षकार म्हणून सामिल करणेबाबत आणि ५० टक्के अपंगत्वानुसार उर्वरित नुकसानभरपाईची रक्कम रू. १,९६,६२३/– आणि त्यावरील व्याज अर्जदार कंपनी आणि विमा कंपनी यांचेकडून संयुक्तपणे मिळणेबाबत जाबदार यांनी विनंती केली.

४. अर्जदार कंपनीने निशाणी सी–११ ला म्हणणे दिले आहे. अर्जदार विमा कंपनीने यापूर्वीच जाबदार यांच्या अपघाती अपंगत्वासंदर्भात या न्यायालयात रक्कम रू. ७,८६,४९२/– इतकी रक्कम जमा केली आहे. अर्जदार कंपनीने त्यांच्या कामगारांकरीता गो डीजीट जनरल इन्शुरन्स कंपनीकडून विमा पॉलिसी काढली असून सदर पॉलिसीची प्रत अर्जदार कंपनीने त्यांच्या म्हणण्यासोबत दाखल केली आहे. जाबदार यांच्या अपघातसमयी सदर विमा पॉलिसी वैध होती. तथापि, अर्जदार यांना वर नमूद रक्कम न्यायालयात भरणे जरूरीचे वाटल्याने त्यांनी सदरची रक्कम न्यायालयात जमा केली. सद्यस्थितीस सदर विमा कंपनीस पक्षकार म्हणून सामिल केल्यास आणि अर्जदार यांनी त्यांचे अर्जात नमूद केलेप्रमाणे त्यांचे अपंगत्वाचे प्रमाण ५० टक्के धरल्यास उर्वरित नुकसानभरपाई देण्याची जबाबदारी ही विमा कंपनीवर राहील. अर्जदार कंपनीने यापूर्वीच नुकसानभरपाईपोटी रक्कम रू. ७,८६,४९२/– इतकी रक्कम न्यायालयात जमा केली असल्याने अर्जदार हे उर्वरित नुकसानभरपाई रक्कम देण्यास जबाबदार नाहीत. सबब, गो डीजीट जनरल इन्शुरन्स कंपनीस आवश्यक पक्षकार म्हणून सामिल करण्यास अर्जदार यांची हरकत नसल्याचे नमूद केले आहे.

५. अर्जदार व जाबदारतर्फे विधीज्ञ यांचा युक्तीवाद ऐकला. अभिलेखावर दाखल केलेल्या कागदपत्रांचे अवलोकन केले. अर्जदार कंपनीने यापूर्वीच नुकसानभरपाईपोटी रक्कम रू. ७,८६,४९२/– इतकी रक्कम न्यायालयात जमा केल्याचे स्पष्ट होते. जाबदार यांनी त्यांचे

अपघाती अपंगत्वाचे प्रमाण ५० टक्के असल्याबाबतचे प्रमाणपत्र दाखल केले असून त्याप्रमाणे अपघाती अपंगत्वाची नुकसानभरपाई ही रक्कम रू. ९,८३,११५/– इतकी येत असल्याचे नमूद केले आहे. जाबदार हे अर्जदार यांचेकडे कंत्राटदारातर्फे कामास होते आणि अर्जदार कंपनीने सर्व कामगारांसाठी विमा पॉलिसी काढली असल्याने विमा कंपनीस प्रस्तुतकामी आवश्यक पक्षकार म्हणून सामिल करणे गरजेचे असल्याचे कथन केले आहे. अर्जातील कथनांचा विचार करता अर्जदार कंपनीने कामगारांचा विमा उतरविल्याने गो डीजीट जनरल इन्शुरन्स कंपनी आवश्यक पक्षकार म्हणून सामिल करण्यात यावे या जाबदारतर्फे विधीज्ञांनी केलेल्या युक्तीवादाशी हे न्यायालय सहमत आहे.  गो डीजीट जनरल इन्शुरन्स कंपनी आवश्यक पक्षकार असल्याने अर्ज मंजूर होण्यास पात्र आहे. सबब, मी खालीलप्रमाणे आदेश पारीत करीत आहे.

## –: <u>आ दे श</u> :–

(१) निशाणी यु–५ कडील अर्ज मंजूर करण्यात आला.

(२) अर्जदार यांनी प्रस्तावित दुरूस्ती पुढील तारखेपर्यंत करावी.

(३) खर्चासंदर्भात कोणतेही आदेश नाहीत.

Digitally signed by
SACHIN GOURIHAR
KORE
Date: 2025.09.09
13:15:14 +0530

स्थळ : सांगली

( एस. जी. कोरे )
आयुक्त, कर्मचारी नुकसानभरपाई कायदा तथा
न्यायाधीश,
कामगार न्यायालय, सांगली

दिनांक : ०९/०९/२०२५